# अर्पणपत्रिका

''बालपणी दिले शिक्षणाचे अमृत,

दिली प्रेरणा, प्रोत्साहन, संजीवन रूप,

क्षितिजाला उल्लंघून जाण्याचं दिलं बळ,

जगण्यासाठी दिले शांतता आणि कष्टाचे पंख,

आभाळाच्या सीमा ओलांडून दिलं जगण्याचं धैर्य.

तळहाताच्या फोडासारखं मला त्यांनी जपलं.

अशा माझ्या तीर्थरूप कै. दादांच्या चरणी.

सविनय अर्पण !''

# ऋणनिर्देश

पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी मराठी हा विषय घेतला असता आधुनिक मराठी वाड्.मयाचा इतिहास वाचण्याची संधी मिळाली. त्यामध्ये आधुनिक मराठी साहित्यात 'प्रवासवर्णन' हा एक वाड्.मयप्रकार विविध अंगांनी कसा विकसित होत गेला याची जाणीव झाली. त्यातील व्यक्तिचित्रे, निसर्गचित्रे अन् त्यांचे वर्णन त्याबरोबरच दंतकथा, शिल्पवर्णन, स्थलवर्णन, शहरांचे विशेष, सण, उत्सव, रूढी, परंपरा, अंधश्रध्दा, आत्मनिवेदनात्मक लेखकाचे प्रवासवर्णनात आलेले वर्णनामुळे मला प्रवासवर्णने वाचण्यास आवडत होती. तसेच ती मुक्तपणाने लिहिलेली असल्याने त्याच्यातील वैविध्य हा गुणही विशेष भावला. त्याची सखोलता सूक्ष्मता जाणून घेण्यासाठी त्याचा सर्वांगाने अभ्यास व्हावा म्हणून एम्. फील या पदव्युत्तर शिक्षणासाठी, सौ. उषा पाणंदीकर यांच्या दोन प्रवासवर्णनांच्या अभ्यासासाठी माझे आदरणीय मार्गदर्शक डॉ. प्रकाश कुंभार यांनी प्रेरणा व मार्गदर्शन केले. त्यांच्या मान्यतेमुळे अभ्यासासाठी हा विषय निवडला.

सौ. उषा पाणंदीकर यांच्या 'आज अिथे..... उद्या तिथे' व 'देखणी दक्षिण' या दोन वैशिष्ट्यपुर्ण पुस्तकांच्या आधारे प्रवासवर्णनपर लेखनांचा अभ्यास करावा असा मनात विचार आला आणि त्यातून हा लघुप्रबंध साकार झाला.

या लघु–प्रबंधाचा अभ्यास करताना माझे आदरणीय मार्गदर्शक डॉ. प्रकाश कुंभार यांच्या मार्गदर्शनाबरोबरच मा. ह. महाडिक महाविद्यालय मोडनिंब मराठीचे प्राध्यापक डॉ. एस. टी. पाटील,डॉ. वामन जाधव, तसेच अर्थशास्त्र विषयाचे व कॉलेजचे प्राचार्य डॉ. दादासाहेब शिंदे यांचेही बहुमोल मार्गदर्शन लाभले. त्याबद्दल मी सर्वांचा ऋणी आहे. तसेच

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. रवींद्र ठाकूर, डॉ. कृष्णा किरवले,प्रा. हिमांशू स्मार्त, डॉ. रणधीर शिंदे यांचेही अप्रतिम मार्गदर्शन मिळाले त्यांच्यामुळेच नेट, सेट ह्या दोन्ही प्राध्यापकासाठी पात्रता परीक्षा पास झालो. त्यांचेही मी ऋण मानतो.

या माझ्या अभ्यासात माझ्या आई–वडिलांचा तसेच विशेष करून लहान भावाचा फार मोठा वाटा आहे. गरीब परिस्थिती असतानाही मला शिक्षणात गरिबीची जाणीव करू दिली नाहीत. त्यांच्या मायेचा आणि कष्टांचा आशीर्वादाचा हात पाठीवरून फिरला. मी एम. फिल. पर्यंतचे शिक्षण करू शकलो आणि अभ्यासक्रमाच्या कालावधीत ॲथलॅटिक्सचे कोच सरदार खान सर यांनीही शारीरिक व्यायाम करून घेतला तसेच माझे जीवलग मित्र आलम शेख, अमीर पटेल, वीर धवल, ओंकार, पंकज शिंदे, पवन, जगदीश पाटील, रणजीत तोंदले, विशाल केणे, निलेश केणे हे नवे मित्र भेटले. एम्. फिल चे माझे मित्र सागर बंगे, पद्माकर वानखेडे, वैशाली चौगुले, प्रशांत धनवडे, राजू खाटकी तसेच पवन चांदेकर, अमोल चांदेकर यांचेही आभार.

ह्या अभ्यासक्रमाच्या कालावधीमध्ये हृदयस्थ म्हणून ज्यांचा उल्लेख करावा असे संजय पाटील (कासारी), कल्लाप्पा चौगुले (कागवाड) जे C. A.परिक्षेचा अभ्यास करणारे मित्र भेटले. त्यांच्याकडून सुख दुःखावर मात करून आयुष्यासाठी संघर्ष कसा करावा हे शिकलो.

संगणकीय अक्षरजुळणीचे काम सौ. राजश्री धनवडे (सायली ग्राफिक्स) यांनी अल्पावधीत आकर्षक स्वरूपात केले त्याबद्दल त्यांचेही आभार !

**शिवाजी संभाजी जगताप**

# भूमिका

आत्तापर्यंतच्या प्रवासवर्णनाचे सिंहावलोकन केले तर असे आढळून येते की, पुरूषांनी प्रवासवर्णने लिहिली आहेत आणि फारच लोकप्रिय झाली आहेत. जनमाणसात त्यांनी स्वत:चे स्थान निर्माण केले आहे. आत्तापर्यंत लेखकांनी प्रवासवर्णने लिहिली आहेत तेही नावाजलेले साहित्यिक आहेत व त्यांच्याकडून अशा लोकप्रिय वाड्.मयाची निर्मिती होणे हे साहजिकच आहे. त्यांच्या प्रतिभाशक्तीची कल्पनाशक्तीची चमक त्यांनी या वाड्.मयप्रकारातून दाखवून दिली आहे.

जेव्हा जेव्हा ही प्रवासवर्णने वाचकवर्ग वाचत असतो तेव्हा त्याला आपण एखाद्या प्रवासाच्या सफरीला निघालो आहोत असा आनंद वाटतो व लेखकाच्या जागी स्वत: वाचक वावरत असल्याचा आनंद तो अनुभवत असतो. मग प्रवास जसजसा पुढे सरकतो तस–तसा वाचक त्या वाचनात अधिकाधिक मग्न होतो. पुढील घटना प्रसंग जाणण्यासाठी अधिकच एकरूप होतो. प्रवासवर्णनाने स्वत:चे एक साहित्य क्षेत्रात स्थान निर्माण केले आहे.

प्रवासवर्णनातील विशेष उणीवेची बाब म्हणजे लेखिका म्हणून स्त्रियांनी प्रवासवर्णने लिहिलेली आहेत. पण तितकीशी साहित्याला जवळीक साधणारी नाहीत. स्त्रियाही प्रवास करतात आपल्या पतीबरोबर वेगवेगळ्या स्थळांना भेटी देतात. प्रवास करण्याचे हेतू, उद्देश, कारणे अनेक असतात. प्रवासाच्या बाबतीत स्त्रियाही मागे नाहीत. पण जेव्हा प्रवास संपतो त्याच ठिकाणी सर्वकाही राहून जाते. एखाद्या गृहिणीला प्रवासवर्णन लिहिण्याची उर्मी असते पण त्या आपला समाज, पती, आप्तेष्ट यांना दबकून असतात त्यामुळे लिखाण करण्याचे धाडस करत नाहीत. काही स्त्रिया लिखाण करतातही पण ते

प्रकाशित होईलच याची शाश्वती देता येत नाही.

स्त्री म्हणून प्रवासवर्णन लिहिले जाते. आपल्या पतीसमवेत जे अनुभव आले ते उषा पाणंदीकर यांनी आपल्या दोन पुस्तकांत नमूद केले आहेत. साहित्याची त्यांच्या घराण्यात पुर्वपरंपरा असल्याने त्यांनी उपरोक्त दोन प्रवासवर्णने लिहिली आहेत. स्त्री म्हणून एक गृहिणी म्हणून आपल्या पतीसमवेत जे अनुभव आले ते त्यांनी आपल्या पुस्तकात मांडले आहेत. त्यांचा हा निर्णय धाडसी म्हणावा लागेल. खरोखरच एक स्त्री लेखिका म्हणून त्या कौतुकास्पद आहेत. त्यांनी आपल्या पती व इतरांची परवानगी घेऊन कलाकृती साकार केल्या आहेत. यासाठी आपल्या पतीकडून त्यांना प्रोत्साहनच मिळाले आहे.

माझ्या लघुप्रबंधाचा विषय 'उषा पाणंदीकर यांच्या प्रवास लेखनाचे विशेष' हा असून एक गृहिणी म्हणून त्यांनी जो प्रवास केला आहे. व तो त्यांनी लेखन रूपाने प्रवास वर्णनात वर्णन केला आहे तो आहे. लेखिका म्हणून त्यांचा अनुभव कसा होता, त्यांना कोणते अनुभव आले, त्यांचे प्रवासाबद्दलचे विचार, भावना, प्रेरणा, प्रतिभाशक्ती, कल्पनाशक्ती, मांडणी, भाषाशैली, निवेदनशैली, स्त्री लेखिका म्हणून वेगळेपण ह्या सर्व घटकांचा मला या लघुप्रबंधामध्ये अभ्यास करायला आवडेल व तो मी करण्याचा प्रयत्न करणार आहे.